शुक्रवार, दि. २८ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २३५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

जागतिक ग्राहक हक्क दिन उत्साहात साजरा

## ग्राहकांनी वस्तु, सेवेची खरेदी करतांना जागरुकता बाळगावी

### अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार

**जालना । प्रतिनिधी -** सुरक्षीत वस्तु खरेदी हा ग्राहकाचा हक्क आहे. ग्राहकाने खरेदी करतांना उत्पादनाशी निगडीत उत्पादनाची गुणवत्ता, प्रमाण, मुल्य, शुध्दता आणि वापरावयाची अंतिम तारीख तपासणे महत्वाचे आहे. या जगात मोफत काहीच मिळत नसते त्यामुळे अनोळखी क्रमांकाच्या कॉलवरुन येणाऱ्या अमिषाला बळी पडू नये. तरी ग्राहकांनी वस्तु, सेवेची खरेदी करते वेळी जागरुकता बाळगणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांनी केले.

जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त ग्राहक जनजागृतीपर कार्यक्रम जालना येथील मस्त्योदरी शिक्षण संस्थेच्या अंकुशराव टोपे महाविद्यालयातील सभागृहात पार पडला. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, तहसीलदार छाया पवार, सायबर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक जी.एस.शिंदे, यांच्यासह जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या अशासकीय सदस्यांची उपस्थिती होती.

अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार म्हणाल्या की, ग्राहकाची फसवणूक झाल्यास उत्पादन, व्यावसायिक किंवा कंपनी यांच्याविषयीची तक्रार ग्राहक संरक्षण कायद्याअंतर्गत करता येवू शकते. ग्राहकाला कोणत्याही कंपनीच्या उत्पादनाची निवड करण्याचा हक्क आहे. कोणत्याही फसव्या जाहिराती, अनोळखी कॉल्सना बळी पडू नका असेही त्यांनी सांगितले.

सायबर पोलिस निरीक्षक श्री. शिंदे म्हणाले की, पुर्वी सायबर गुन्ह्यात आर्थिक फसवणूक करण्यात येत होती. तरुणांनी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशा पोस्ट समाज माध्यमांवर पोस्ट करु नये. आता नवीन प्रकारात समाज माध्यमांचा वापर करुन फेक आयडी तयार करत बदनामीकारक मजकुरासह फोटो टाकून बदनामी करण्यात येत आहे. व्हॉटसअप हॅक करुन आपल्या जवळच्या व्यक्तीकडून पैशाची मागणी करण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. यामध्ये एपीके फाईल्सचा शिरकाव झाला आहे. एपीके फाईल्स आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करु नये, त्यामुळे आपला मोबाईल क्सेस सायबर क्रिमीनलकडे जावून तो हवा तसा आपला महत्वाचा डेटा वापरुन फसवणूक करु शकतो. असे सांगून त्यांनी महाविद्यालयीन तरुण-तरुणींची थेट व्हॉटसअप व मोबाईलमधील पान २ वर

आमदार बबनराव लोणीकर यांचा दणका;

## वॉटर ग्रीडचा पाणीपुरवठा झाला सुरळीत

**परतूर । प्रतिनिधी -** पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती कोरके यांनी पाणीपट्टी वसुलीसाठी कुठलेही प्रयत्न न करता केवळ कागदपत्रे नोटीस बजावून १७३ गाव व ९५ गाव वॉटर ग्रीड चे पाणी बंद केले होते. लोकप्रतिनिधी म्हणून आमदार बबनराव लोणीकर यांनी वारंवार सूचना करून देखील पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला नव्हता त्यामुळे संतप्त झालेल्या आमदार बबनराव लोणीकर यांनी थेट विधिमंडळात हा विषय मांडला १६ मार्च रोजी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तात्काळ पाणीपुरवठा सुरू केला जाईल असे आश्वासन विधिमंडळात दिले होते परंतु रजाकरी आणि इंग्रज प्रवृत्तीच्या कार्यकारी अभियंता श्रीमती कोरके यांनी मंत्री महोदयांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली आणि पुन्हा एकदा पाणीपुरवठा बंद केला होता. आमदार बबनराव लोणीकर यच्या दणक्याने हा पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

विधिमंडळात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आश्वासन दिलेले असताना देखील कार्यकारी अभियंता श्रीमती कोरके यांनी ९५ गाव वॉटर ग्रीडला सुरू असलेला पाणीपुरवठा बंद केला ही बाब आमदार बबनराव लोणीकर यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिली. एखाद्या मंत्र्याने सभागृहात दिलेला शब्द अधिकाऱ्यांनी न पाळणे हा त्या सभागृहाचा अवमान आहे हे बाब आमदार बबनराव लोणीकर यांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी लोणीकरांच्या प्रश्नाला उत्तर देताना संबंधित अधिकाऱ्यावर कठोर कारवाई केली जाईल. पाच लाख लोकांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न आहे त्यामुळे जर हे पाणी बंद केले तर खबरदार गाठ माझ्याशी आहे अशा शब्दात आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभा दणाणून सोडली होती



आमदार बबनराव लोणीकरांनी पाणीपुरवठा खंडित केल्याच्या विरोधात विधानसभा अक्षरशः डोक्यावर घेतली रजाकरी व इंग्रज प्रवृत्तीच्या कार्यकारी अभियंता श्रीमती कोरके यांना तात्काळ निलंबित करा अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली होती. पाटबंधारे विभागाने पाणीपट्टी वसुलीसाठी जनजागृती करणे गावात दवंडी देणे वर्तमानपत्रात बातम्या प्रसिद्ध करणे ग्रामसभा घेणे अशा विविध माध्यमातून जनजागृती करून पाणीपट्टी वसुली केली जाऊ शकते त्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही कायम पाटबंधारे विभागाच्या सोबत आहोत परंतु रजाकरी प्रवृत्तीने पाच लाख लोकांचे पिण्याचे पाणी पाटबंधारे विभाग बंद करणार असेल तर ते होऊ देणार नाही असे देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.

## माहोरा नगरीत अखंड हरिनाम सप्ताह भावार्थ रामायण व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील माहोरा ता. जाफराबाद येथे रेणुका माता कृपेने अखंड हरिनाम सप्ताह भावार्थ रामायण व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. चैत्र शु.९ शके १९४७ रोज रविवार दि.०६/०४/२०२५ ला अखंड हरिनाम सप्ताह प्रारंभ होणार आहे. भावार्थ रामायण व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण साठी रामायणाचार्य ह.भ.प.श्री शाम महाराज बोर्ड असणार आहे.

दैनंदिन कार्यक्रम सकाळी ४ ते ६ काकडा ८ ते १० ज्ञानेश्वरी पारायण दुपारी २ ते ४ भावार्थ रामायण सायंकाळी ६ ते ८ हरिपाठ रात्री ८.३०ते १०.३० वाजता हरी किर्तन. असा दैनंदिन कार्यक्रम होणार आहे. १) तसेच दि.०६/०४/२०२५ रोज रविवार ह. भ.प.श्री रवींद्र महाराज महाले यांचे ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत हरिकिर्तन होणार आहे. २)०७/०४/२०२५ रोज सीमावर ह.भ.प. अनिताताई पवार यांचे हरिकिर्तान यांचे ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत हरी किर्तन होणार आहे. ३) दि.०८/०४/२०२५ रोज मंगळवार या दिवशी श्री विष्णू महाराज सास्ते यांचे रात्री ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत हरी कीर्तन होणार आहे. ४) दि.०९/०४/२०२५ रोज बुधवार या दिवशी झगरे गुरुजी यांचे हरी कीर्तन होणार आहे. ५) दि.

१०/०४/२०२५ वार गुरूवार या दिवशी ज्ञानेश्वर माऊली महाराज (शेलुदकर) यांचे रात्री ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत हरी किर्तन होणार आहे. ६) दि.११/०४/२०२५ रोज शुक्रवार ह.भ.प. श्री नीलेश महाराज भुंबरे यांचे रात्री ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत हरी कीर्तन होणार आहे.




७) दि.१२/०४/२०२५ रोज शनिवार यादिवशी ह. भ.प.श्री अजेबराव महाराज मिरगे यांचे ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत हरी किर्तन होणार आहे. ८) दि.१३/०४/२०२५ रोज रविवार यादिवशी श्री शाम महाराज बोर्ड यांचे रात्री ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत हरी कीर्तन होणार आहे. तसेच गायनाचार्य ह.भ. प. भागवत लोखंडे, ह.भ. प. विठ्ठल कापसे, उबाळे, ह.भ.प. आनंद ह.भ.प.बालाजी अंभोरे, मृदुंगाचार्य ह.भ.प. ऋषिकेश देशमुख विणकरी दत्तू शेवणकर, नानाभट्ट जाधव, हरिदास राऊत, उत्तमराव कळम चौपदार सुभाषराव शहागडकर, किसनराव कासोद कार्यक्रमाची सांगता चैत्र कृ. १ शके १९४७ रोज रविवार १३/०४/२०२५ या दिवशी महाप्रसादाने होणार आहे अशा प्रकारे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती संयोजक ह.भ.प. पद्माकर वाघ आणि माहोरा येथील गावकरी मंडळी यांनी दिली आहे.

युवा आदर्श

### टोल ट्रोल ...

हॉटविषय रंगलेला
नाक्यांवरला टोल
थट्टा मस्करी चालू
सगळे होतात ट्रोल
रस्ते छान हवेत तर
अटळ भरावा टोल
कितीदिवस भरावा
सारे होतात अबोल
टोल माफी बद्दलचे
उत्तर ते गोलमटोल
रागाचे उद्रेक होवून
जाई कुणाचा तोल
सेवा अन् किराया
असो जरा समतोल
निमीत्ते राज कारण
बडवत बसती ढोल
महत्व आपले वाढवे
खलनायकाचा रोल
मुदत संपली वसुली
करतात कुणी झोल
साटे लोटे चाललेले
घाला घोळात घोळ
नासाडीपिकाची करे
सजून बसलेतं टोळ
फायदा कमवू फुका
पोटांचे नगारे गोल
सांगून टाका एकदा
कधीपर्यंत चालूटोल
योजनेचा बोजवारा
होतो हेतू मातीमोल
नको ते फेंदाडे पाय
टोलचे जाणावे मोल

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## आजपासुन नवान्ह पारायण सुरु


**जालना । प्रतिनिधी -** श्री राम मंदिर विश्वस्थ मंडल आणि श्री राम सुंदरकांड सत्संग परिवार चा संयुक्त विद्यमाने चैत्र नवरात्री श्री राम नवमी निमित्त मांगील सात दशका पासुन श्री रामचरित मानस (रामायण) नवान्ह पारायण चे आयोजन होत असुन दी २८/३/२५ शुक्रवार ते



दी ५/४/२५शनिवार पर्यन्त अंतर राष्ट्रीय ख्याति प्राप्त प पु श्री मनोज जी महाराज गौड़ चा ओजस्वी वाणितुन दर रोज दुपारी ४ ते रात्री ९ वाजे पर्यन्त श्री राम मंदिर बड़ी सड़क मधे होत असुन शहरातील सर्व हिन्दू बंधु भगिनी सदर कथा चा लाभ प्राप्त करुण आत्म कल्याण, प्रभु श्री रामराया ची कृपा प्राप्त करावी असे आवाहन आयोजकां तर्फे कारण्यत आले.

## जालना येथे 'द पॅशन ऑफ द क्राईस्ट' नाटकाचे भव्य आयोजन

**जालना -** प्रभू येशू ख्रिस्तांनी मानवजातीसाठी जे बलीदान दिले त्यावर आधारित भव्य दिव्य आणि हृदयस्पर्शी द पॅशन ऑफ द क्राईस्ट नाटकाचे आयोजन फेथ फाऊंडेशन, पुणे यांच्या सादरीकरणातून तब्बल ६५ कलाकारांच्या अभिनयातून जालना शहरात साकारले जाणार आहे. हे नाटक दिनांक: २९ मार्च २०२५ (शनिवार)




रोजी संध्याकाळी ६ वाजता डॉ. फ्रेझर बॉईज हायस्कूल ग्राउंड, जालना येथे सादर करण्यात येणार आहे ख्रिस्ती बांधवांचे पवित्र ४० दिवसांचे उपवास सध्या सुरू असून, या नाटकाद्वारे प्रभू येशूनी मानवजातीसाठी दिलेल्या बलिदानाची जाणीव होईल व आध्यात्मिक उन्नती साधता येईल. या नाटकाद्वारे प्रभू येशू ख्रिस्तांच्या त्यागाची आणि प्रेमाची कथा प्रेक्षकांसमोर मांडली जाणार आहे. हा कार्यक्रम पाहून प्रत्येकाला आशिर्वाद मिळावा, असा आयोजकांचा उद्देश आहे. या विशेष कार्यक्रमाचे आयोजन सर्व चर्च, जालना पास्टर्स फेलोशिप आणि ख्रिस्ती समाजाच्या सहयोगाने करण्यात आले आहे. जालनावासीयांनी या पवित्र आणि प्रेरणादायी नाटकाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर

**जालना । प्रतिनिधी -** नवोदय विद्यालय समितीद्वारे इयत्ता सहावीसाठी घेण्यात आलेल्या निवड चाचणी परीक्षा -२०२५ चा निकाल जाहीर करण्यात आला आहे. जालना जिल्ह्यातील पीएम श्री नवोदय विद्यालयासाठी एकुण ८० विद्यार्थ्यांची निवड यादी प्राप्त झाली असून विद्यालयाच्या सुचना फलकावर यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. तरी निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे तात्काळ सादर करावी, असे आवाहन प्राचार्य एस. जी. पवार यांनी केले आहे.

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयाच्या इयत्ता सहावीच्या ८० जागेसाठी घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या निकालात जालना जिल्ह्यातील विविध तालुक्यामधील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. तालुकानिहाय निकालानुसार पुढीलप्रमाणे विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. यामध्ये जालना ११, भोकरदन १०, जाफराबाद ८, परतूर १२, अंबड ११, बदनापूर ६, घनसावंगी १४, मंठा ८ असे एकुण ८० विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल नवोदय विद्यालयाचे प्राचार्य एस. जी. पवार आणि शिक्षकांसह पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे कौतुक होत आहे. नवोदय विद्यालय समितीद्वारे इयत्ता नववीमध्ये रिक्त असलेल्या ४ जागेसाठी घेण्यात पान २ वर

## माहोरा येथे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांचे स्वागत



**जाफराबाद । प्रतिनिधी -** अंबादास दानवे विदर्भ दौऱ्यावर असतांना माहोरा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात थांबले असता त्यांनी सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. त्यानंतर अंबादास दानवे यांचे सुरेश बोरसे यांनी त्यांचे शाल आणि पुष्पहार देऊन स्वागत केले. यावेळी उपस्थित शिवसेना कार्यकर्ते पान २ वर

## गोदा समृध्दी कृषी महोत्सवाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** प्रकल्प संचालक (आत्मा) व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी जालना यांच्यावतीने पाच दिवसीय आझाद मैदान, जालना येथे दि. २७ ते ३१ मार्च या कालावधीत गोदा समृध्दी जालना कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे आज महिला शेतकऱ्यांच्या हस्ते फीत कापुन गोदा समृद्धी कृषी महोत्सव सर्वांसाठी खुला करण्यात आला असून, ३१ मार्च, २०२५ पर्यंत सर्वांसाठी प्रदर्शन खुले असणार आहे.

या महोत्सवासाठी आत्माचे प्रकल्प संचालक जे पी शिंदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जी. आ.र कापसे, उपविभागीय कृषि अधिकारी, राम रोडगे, प्रशांत पवार, आत्माचे प्रकल्प उप संचालक अमोल आगवान, दत्तात्रय सुर्यवंशी यांचेसह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, शेतकरी यांची उपस्थिती होती.

कृषी विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव आयोजित केला जातो. या महोत्सवातून शेतकरी बांधवांना शेती पान २ वर

## वाहन विक्रीच्या व्यवहारातून दलालांच्या दोन गटात हाणामारी

### जालन्यातील भोकरदन नाका रामतीर्थ परिसरातील घटना

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील भोकरदन नाका रामतीर्थ परिसरात जालना-संभाजीनगर महामार्गावर वाहन विक्रीच्या व्यवहारातून दलालांच्या दोन गटात तुंबळ हाणामारी झाल्याची घटना आज दिनांक २६ बुधवार रोजी सायंकाळी साडे सातच्या सुमारास घडलीय तब्बल अर्धातास सुरू असलेल्या या वादामुळे जालना-संभाजीनगर महामार्गावरून जाणाऱ्या नागरिकांना या वादामुळे अडथळा निर्माण झाला होता. वाहन खरेदी विक्रीच्या व्यवहारातून दलालांच्या दोन गटात हा वाद झाला वादच रूपांतर नंतर तुंबळ हाणामारीत झाल्याचं समोर आलंय.परिसरातील व्यापाऱ्यांनी मध्यस्थी करत हा वाद मिटवल्याची पान २ वर



# संपादकीय

## भेसळखोरांना रोखा

पनीर पासून तयार करण्यात आलेले डिशेस सर्वचजण चवीने खातात. लहान मुलांना तर पनीर खूपच आवडते. मात्र ह्याच सर्वांच्या आवडत्या पनीर मध्ये भेसळ होत असल्याची आणि राज्यभरात विकले जाणारे पनीर बनावट असल्याचा मुद्दा श्रीगोंद्याचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी विधानसभेत मंडला. राज्यात विकले जाणारे पनीर बनावट असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होतीच आमदार साहेबांनी त्यावर शिक्कमोर्तब केले. बनावट पनीर तयार करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांनी केली. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या महत्वाच्या मुद्द्यावर चर्चा घडवून आणल्याबद्दल आमदार पाचपुते साहेब तसेच भेसळ खोरांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब यांचे मनापासून आभार! बनावट पनीर तयार करून नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या महाभागांना शिक्षा झाली पाहिजेच पण केवळ बनावट पनीर तयार करणारेच नव्हे तर सर्व भेसळखोरांवर कारवाई झाली पाहिजे. राज्यात भेसळ खोरांनी उच्छाद मांडला आहे . राज्यात दूध भेसळीचे प्रकार वाढत आहे. एक लिटर दुधात काही रासायनिक पदार्थ टाकून वीस लिटर दुध बनवण्याचे प्रकार सुरू आहे. मागील वर्षी अहिल्यानगर जिल्ह्यातच दूध भेसळीचे रॅकेट उघडकीस आले होते . दौंडमध्येही म्हशींनी अधिक दूध द्यावे यासाठी त्यांना प्रतिबंधक इंजेक्शन दिले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. केवळ दुधातच नव्हे तर मिठाईमध्येही भेसळ केली जात आहे. मिठाई बनवताना वापरण्यात येणाऱ्या खव्यामध्येही भेसळ असल्याच्या अनेक घटना राज्यात उघडकीस आल्या आहेत. बर्फी किंवा खवा दुधापासूनच बनतो अशी सर्वसामान्यांची धारणा असते. फराळाचे पदार्थ बनवण्यासाठी त्याचा उपयोग केला जातो. लहान मुलांना हे खव्यापासून तयार केलेले पदार्थ खूप आवडतात. त्याला मागणीही जास्त असते त्यामुळेच वर्षानुवर्षे पडलेली दुधाची पावडर, स्टार्च, वनस्पती तूप, दूध याबरोबरच काही प्रमाणात रसायन मिसळून तयार केलेला निकृष्ट खवा भेसळखोर बाजारात खवपीत आहेत. काही भेसळखोर दर्जेदार खाद्यान्नाच्या ब्रॅण्डसशी साम्य असणारे बनावट, कमअस्सल तब्येतीला घातक पदार्थ सारख्याच दिसणाऱ्या वेष्टनातून विकत आहेत. हे पदार्थ शहरातील प्रश्नार्थक वातावरणात बनवले जातात. हे पदार्थ रस्त्यांवर कुत्री मांजरी फिरण्याच्या ठिकाणी वाळत घातलेले दिसतात. भेसळखोरांमुळे ग्राहकांचे आरोग्यच धोक्यात आले आहे. दुध, मिठाई आणि खाद्यपदार्थांत भेसळ होत असल्याने ग्राहकांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. भेसळयुक्त दुधामुळे ग्राहकांचे हृदय, किडनी व यकृत निकामी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. दुधातील भेसळीमुळे शरीर वाढीसाठी आवश्यक असणारे लायसीन हे अमिनो आम्ल शरीरास उपलब्ध होत नाही परिणामी लहान मुलांच्या शरीर वाढीवर परिणाम होऊन शरीराची वाढ खुंटते शिवाय उच्च रक्तदाब व हृदय विकारासारखे आजार जडतात. भेसळयुक्त पदार्थांचे सेवन केल्याने आगामी वीस वर्षांत देशातील तीस ते चाळीस टक्के लोकांना कर्करोग होऊ शकतो असा इशाराच जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे. हे एक प्रकारचे स्लो पॉईजन आहे. हे स्लो पॉईजन देऊन ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणारे मोठे रॅकेट राज्यभरात कार्यरत आहे. या रॅकेटचा आणि त्यात सहभागी असलेल्या समाज कंटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करायला हवी. ही भेसळखोरी रोखण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनाची अर्थात एफ डी ए ची आहे. ते त्यांची जबाबदारी पार पाडतही आहे त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाच्या नवी मुंबई परिमंडळ २ ला अलीकडेच नवी दिल्लीच्या ईट राईट इंडियाच्या उपक्रमात सहभागी होऊन २०२२ - २३ साठीचे पाच लाखांचे पारितोषिक अन्न सुरक्षा मानके प्राधिकरणाचकडून प्राप्त झाले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदनच मात्र एफ डी आयच्या कारवाईत सातत्य नाही. कारवाईत सातत्य नसल्यानेच भेसळखोरांना त्यांची भीती वाटेनाशी झाली आहे. एफ डी आय चा वचक नसल्यानेच राज्यात भेसळखोरी वाढली आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. दूध आणि खाद्य पदार्थातील भेसळखोरी रोखण्यासाठी पोलीस आणि एफ डी ए ने एकत्र येऊन राज्यभरात धडक मोहीम राबवायला हवी. कमी श्रमात अधिक नफा मिळवण्यासाठी ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या भेसळखोरांना थेट फाशीचीच शिक्षा द्यायला हवी.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## आनंद फाऊंडेशन मुंबई यांच्या वतीने लोककलावंताचा गौरव

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** नुकतेच मुंबई येथे आनंद फाऊंडेशन यांच्या वतीने दिनांक १५ व १६ मार्च महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील लोककलावंताचा कार्येयक्रम आयोजित करून, त्यांचा गौरव करण्यात आला आहे. यामध्ये जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यातील अकोला देव येथील मानव सेवा सांस्कृतिक कला मंच चे. चालक अनिल भदर्गे व सहकारी यांचा सुद्धा मुंबई लोककला अकादमीचे प्रमुख व जालना जिल्ह्याचे भुमी पुत्र डॉ. प्रा.गणेश दादा चंदनशिवे यांच्या हस्ते सत्कार करून गौरविण्यात आले.

यावेळी अनिल भदर्गे यांनी सांगितले की, जाफराबाद तालुक्यातील लोककलावंत हृदय सम्राट आमचे डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या पुण्यानं मानव सेवा सांस्कृतिक कला मंच अकोला देव यांना मुंबई दर्शनाची संधी मिळाली. अनेक विषयावर दादा चंदनशिवे यांच्या सोबत चर्चा झाली ही मराठवाड्यातील लोक कला जिवंत कशी राहील यासाठी गणेश दादा चंदनशिवे यांनी सर्व लोक कलावंत यांना मार्गदर्शन केले यावेळी आनंद फाऊंडेशन मुंबई याच्या संस्थापक अध्यक्षा अपूर्वा ताई वैद्य, महेश सर शाहीर अप्पा साहेब उगले, जालना शाहीर गिरी नांदेड, शाहीर बळीराम घोगरे लातूर, राहुल कासोद, विष्णू गोडबोले व मानव सेवा सांस्कृतिक कला मंच चे भगवान मगरे, दादाराव साबळे, संगीता दिलीप छडीदार, शाहीर अनिल भदरगे यांची उपस्थिती होते.

## नाट्य मंदिरचे 'श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर असे नामांतर

**मुंबई -** दादर येथे सुप्रसिद्ध असे शिवाजी नाट्य मंदिर आहे. नाट्य मंदिराच्या नावामुळे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख केला जात होता. याविरोधात सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार असलेल्या रवींद्र जाधव कोतापकर यांनी धर्मादाय आयुक्तांकडे धाव घेतली होती. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून शिवाजी नाट्य मंदिरचे श्री. छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर' असे नामांतर करण्यात आले आहे.

श्री. छत्रपती शिवाजी स्मारक मंडळ ट्रस्ट मुंबई या संस्थेची ३१ डिसेंबर १९४३ रोजी स्थापना करण्यात आली. दादर पश्चिम येथे या ट्रस्टचे शिवाजी मंदिर नाट्यगृह आहे. मुंबईच्या मध्यभागी असलेल्या या नाट्यगृहाने अनेक नाट्य कलाकार घडविले. नाट्यगृहाला अनेक राजकीय सामाजिक कला व पत्रकारिता या क्षेत्रातील नामवंत, विचारवंत व्यक्तींनी भेटी दिल्या आहेत. परंतू नाट्य मंदिराच्या नावामुळे शिवरायांचा एकेरी उल्लेख होत असल्याची बाब कोणाच्याही निदर्शनास आली नाही.




नाट्यगृहाचे नुकतेच नूतनीकरण करण्यात आले. नूतनीकरण करून नाट्यगृह पुन्हा सुरू करण्यात आले. परंतु त्याचे नाव मात्र बदल न करता पूर्वीप्रमाणे ठेवण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा एकेरी उल्लेख होत असल्याने कोतापूर गावचे सुपुत्र पत्रकार रवींद्र बाबाजी जाधव रवि कोतापकर व त्यांचे मित्र दीपक घेवदे यांनी नाट्य मंदिराच्या ट्रस्टला १४ जानेवारी २०२३ रोजी पत्र दिले होते. याबाबत मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, विरोधी पक्ष नेते यांना पत्र लिहिले होते. त्याची कोणीही दखल घेतली नाही.

शिवरायांच्या अवमानाकडे सर्वांचे दुर्लक्ष होत असल्याने रवींद्र जाधव कोतापकर व त्यांचे मित्र दीपक घेवदे यांनी २२ जुलै २०२४ रोजी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय येथे धर्मादाय आयुक्त यांच्याकडे लेखी तक्रार केली. तक्रारीच्या सुनावणी दरम्यान ट्रस्टकडून तक्रारदारांना कागदपत्र तसेच माहिती देण्यास चालढकल करण्यात आली. अखेर धर्मादाय आयुक्त ट्रस्टच्या विरोधात निकाल देण्याआधीच ट्रस्ट आणि नाट्य मंदिराच्या नावात बदल करण्यात आला. शिवजयंतीच्या मुहूर्तावर नाट्यगृहाच्या नावात श्री. छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर असा सन्मान जनक बदल करण्यात आला. तसे लेखी पत्र तक्रारदार रवींद्र जाधव व धर्मादाय आयुक्तांना देण्यात आले. शिवरायांचा एकेरी उल्लेख करणे आता बंद झाल्याने रवींद्र जाधव यांचे अभिनंदन केले जात आहे.









पान १ वरुन

### ग्राहकांनी वस्तु ...

आवश्यक सुरक्षा सेटींग जागेवर करुन घेतली.

कार्यक्रमात पवन सांगळे विद्यार्थ्याने सायबर क्राईम विषयक निर्भिडपणे प्रश्न विचारत आपल्या मनात असलेल्या शंकेचे समाधान करुन घेतले. तसेच केवळ मनोरंजन म्हणून नव्हे तर शिक्षण विषयक युट्युब चॅनेलचा अभ्यासासाठी खुप फायदा होतो असे सांगून कार्यक्रमाचे कौतुक करत या प्रकारचे जनजागृतीपर कार्यक्रम प्रत्येक महाविद्यालयात नियमितपणे घेणे गरजेचे असल्याची भावनाही त्याने व्यक्त केली.

कार्यक्रमात नारायण काळे आणि श्रीमती विद्या वाहुळे या स्वस्त धान्य दुकानदारांनी त्यांच्याकडील शिधापत्रिका धारकांची १०० टक्के ई-केवायसी पुर्ण केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी सांगितले की, पुर्वीच्या काळात वस्तुविनिमय पध्दती अस्तित्वात होती. एका वस्तुच्या बदल्यात दुसरी हवी असणारी वस्तु ग्राहकाला मिळत होती. कालांतराने चलन पध्दतीचा उदय झाला आणि विक्रेत्यांची ग्राहकांशी बांधिलकी राहिली नाही, त्यामुळे फसवणुकीच्या घटना घडण्यास सुरुवात झाली. ग्राहकांच्या संरक्षणासाठी भारतात १९८६ ला पहिला ग्राहक संरक्षण कायदा तयार झाला तर त्यामध्ये बदल करुन २०१९ ला नवा कायदा तयार करण्यात आला. याप्रमाणे जागतिक ग्राहक हक्क दिनाची पार्श्वभूमी सांगून कार्यक्रम आयोजनामागील भूमिका विषद केली. या कार्यक्रमास नागरिक तसेच महाविद्यालयीन युवक-युवतींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

### जवाहर नवोदय...

आलेल्या निवड चाचणी परीक्षेचा निकालही जाहीर केला असून नवोदय विद्यालयासाठी एकुण चार विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. परीक्षेला जालना जिल्ह्यातून इयत्ता आठवीचे एकूण ४४६ विद्यार्थी बसले होते. ही निवड यादी नवोदय विद्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. या असेही कळविले आहे.

### माहोरा येथे ...

बाळासाहेब देशमुख पिंपळगांव (रे), जलिंधर बुधवत बुलढाणा आणि भास्कर जाधव, रामदास कदम, कृष्णा पोफळे, राजू गौरकर, बाळू जाधव, राजू बोराडे, विमोचन बोरसे हे उपस्थित होते.

### गोदा समृद्धी ...

क्षेत्रातील पारंपारिक आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळते. सदरील महोत्सवात २०० स्टॉलमध्ये विविध विभागाच्या योजनांचे प्रचार प्रसिद्धीसाठी स्टॉल लावण्यात आले असून शेतकऱ्यांनी गहू, ज्वारी व डाळी विक्रीसाठी आणल्या आहेत. कृषी निविष्ठा, कृषि औजारे, बचत गटांच्या स्टॉलमध्ये संधी देऊन विक्रीसाठी दालन आजपासून खुले करून देण्यात आले आहे.

### वाहन विक्रीच्या ...

माहिती ही समोर आलीय मात्र नागरिकांना नाहक त्रास या वादामुळे सहन करावा लागलाय. आता या प्रकरणात पोलीस काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

श्रीष्टी वाहेगावच्या ग्रामस्थांना दिलेला शब्द आमदार लोणीकरांनी पाळला; गावकऱ्यांनी मानले आभार

# मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून रस्त्याच्या डांबरीकरणाला सुरुवात






**परतूर । प्रतिनिधी -** निवडणुकीपूर्वी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी श्रीष्टी ते वाहेगाव श्रीष्टी रस्त्याच्या कामाचा शब्द श्रीष्टि वाहेगाव येथील ग्रामस्थांना दिला होता. या रस्त्याच्या कामाचे उद्घाटन निवडणुकीपूर्वी आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाली होते विधानसभेची निवडणूक होताच आमदार बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून या रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली सध्या डांबरीकरणाची काम अंतिम टप्प्यात असून येत्या दोन दिवसांमध्ये हा रस्ता गावकऱ्यांसाठी खुला होणार असल्याने गावकऱ्यांच्या वतीने माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत. खरे तर गेल्या पाच सात वर्षापासून या रस्त्याचा प्रश्न अतिशय जटिल बनला होता श्रीष्टी वाहेगाव वरून परतुर कडे येणाऱ्या आजारी असणाऱ्या व्यक्ती सर्वसामान्य कामासाठी येणारे नागरिक यांना खूप मोठ्या प्रमाणात अडचणीचा सामना करावा लागत होता या रस्त्यावर अनेक वेळा खड्ड्यामध्ये दुचाकी घसरून अपघात झालेले आहेत

या पार्श्वभूमीवर आमदार बबनराव लोणीकर यांनी पुढाकार घेत या रस्त्याचे काम करून दिल्याबद्दल किसनराव आघाव नारायणराव आघाव सर्जेराव आघाव सखाराम काकडे सत्यनारायण दराडे सुदामराव वाघ हरिभाऊ आघाव विठ्ठला गाव शाळीग्राम भदर्गे देविदास थोरात कारभारी वाघ रमेश आघाव सीमाताई सोळंके वंदनाताई आघाव सुभद्राताई वाघ गीता ताई काकडे रत्नमाला आघाव कविता ताई भदर्गे आशामती ताई थोरात यांच्यासह गावातील नागरिकांनी आमदार लोणीकरांचे आभार व्यक्त केले आहेत.

डॉल्फिन इंग्लिश शाळेची विद्यार्थिनी

## कु. भाविका खरात हीची नवोदयसाठी निवड




**परतूर । प्रतिनिधी -** जवाहर नवोदय विद्यालयाच्या शैक्षणीक वर्ष २०२५-२६ वर्ग ६ वी च्या प्रवेश परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये परतुर तालुक्यातील वाटुर फाटा येथील डॉल्फिन इंग्लिश स्कूल मध्ये शिक्षण घेत असलेली विद्यार्थिनी कूं भाविका अमोल खरात हिने नवोदय प्रवेश परीक्षांमध्ये घवघवीत यश प्राप्त केले आहे. तिच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक व शाळेतील शिक्षकांच्या वतीने कु. भाविका व तिचे पालक यांचा सत्कार करण्यांत आला व येऊन पुढील वाटचालीस तीला शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## शिक्षक संतोष सवडे यांचा गौरव




**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथे शिक्षण घेऊन अकोला देव येथील छोट्या गावातून पुढे शिक्षक म्हणून छाप पाडणारे शिक्षक जालना सरस्वती भुवन प्रशाला, जालना येथील शिक्षक संतोष सवडे यांनी दर्जेदार व्हिडिओ निर्मिती २०२३ स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांनी तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला, तर जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक मिळवत आपल्या कौशल्याची चमक दाखवली.

जिल्हा परिषद शिक्षण विभाग, जालना आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव आज करण्यात आला. संतोष सवडे यांना ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य राजेंद्र कांबळे, ज्येष्ठ अधिव्याख्याते संजय येवते व प्रमोद कुमावत, उपशिक्षणाधिकारी देशमुख, सुभाष भालेराव आणि डॉ. राजेश सरकटे,

अधिव्याख्याता डॉ.नीलोफर पटेल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ड.दिनेश वकील, सरचिटणीस डॉ.श्रीरंग देशपांडे, सहचिटणीस डॉ.रश्मी बोरीकर, स्थानिक शालेय समितीच्या अध्यक्ष प्राध्यापक डॉ. ज्योती धर्माधिकारी, मुख्याध्यापक दिलीप कुमार महाजन आणि मुख्याध्यापिका नीलिमा दंडे यांनी अभिनंदन केले आहे. संतोष सवडे यांच्या यशाने सरस्वती भुवन प्रशालेचा गौरव दुणावला आहे.

## दृष्टी लॉयन्स नेत्रालय क्लबच्यावतीने कृष्णा काळे यांचा सत्कार

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहरातील दृष्टी लॉयन्स नेत्रालय क्लबच्या वतीने दि.२६/०३/२०२५, रोजी दवाखान्यात छोट्या खानी सत्काराचा कार्यक्रम लॉयन्स नेत्रालयाचे अध्यक्ष मनोहर खालापुरे यांनी घेतला होता.यावेळी पुरुषोत्तम वायाळ, कृष्णा काळे. अर्जुन पाडेवार यांचा पुष्पहार व शाल देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वायाळ यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की परतुर तालुका वाटुर सारखा गाव आणि ही पंचकोशी आपण जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत घेऊन गेलो आणि त्याचा निमित्त आज माध्यमातून या ठिकाणी आम्हाला फोनवर आमंत्रित केलं व आमचा सत्कार केला मी २००६पासून आर्ट ऑफ लिविंग सद्गुरु परमपूज्य गुरुदेव शिष्य रविशंकरजीच्या सानिध्यात आलो आणि मला सामाजिक कामाची आवड निर्माण झाली आणि तेव्हापासून आपण माणसाच्या जन्माला आलोय फक्त आपण श्रीमंत होऊन आपण वैयक्तिक संपत्ती करून आनंद घेणे हे वैयक्तिक स्वतःसाठी होऊ शकतं असा आनंद हा वाटून असंख्य लोकांनी आनंद मध्ये सहभागी जर आपण केलं तर खऱ्या अर्थाने आपल्या मनात मानवी जीवनाचं म्हणजे आनंद मिळाला याचे समाधान आपल्याला मिळत आहे. गुरुदेवांच्या विचाराने प्रेरित होऊन २००६ पासून आणि सामाजिक कामाला सुरुवात केली मला सांगायला अभिमान वाटेल की छोट्या छोट्या प्रकल्पाच्या माध्यमातून या पंचकोशी सेवा करण्याची संधी आम्हाला मिळाली आज माझ्या बाजूला ज्याने आपल्या तालुक्याचे नाव उज्वल केलं भारतातून ५० वा नंबर मिळवणं म्हणजे काय साधी गोष्ट नाहीये खडकी हे गाव जर कुणाला सांगितलं तर लोकांचा विश्वास बसणार नाही कुठे खडकी आणि अशा दुर्गम भागांमध्ये राहून शेतकऱ्यांच्या पोटी जन्म घेऊन म्हणजे प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण घेऊन आज ती अनुकूलता प्राप्त करणे ही साधी गोष्ट नाहीये मला सांगायला अभिमान वाटेल की त्या खडकीमध्ये पण आम्ही सेवा करण्याचे काम केलेलं आहे. कृष्णा शिवाजीराव काळे रा. खडकी यांनी आय ए एस उत्तीर्ण होऊन आपल्या देशातून ५० वा क्रमांक मिळवला आहे तर महाराष्ट्रातून पहिला क्रमांक मिळवला आहे असेही ते म्हणाले. लॉयन्स परिवार व दृष्टी फाऊंडेशनचे सर्व संचालका तर्फे यांचा सत्कार व अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खालापूर यांनी केले उपस्थिताचे आभार लॉयन्स क्लबचे डॉ. चव्हाण यांनी मानले.




# संभाजी ब्रिगेडने आणला ग्रामसेवकाचा मनमानी कारभार चव्हाट्यावर!

**मंठा । प्रतिनिधी -** संभाजी ब्रिगेड मंठाच्या माध्यमातून मागील अनेक महिण्यापासून ग्रामसेवक हा मुख्यालयी वास्तव्यास असावा ह्या मागणीसाठी वेळोवेळी पंचायत समितीला निवेदन असतील आंदोलन असेल त्याचबरोबर सर्वोतोपरी पाठपुरावा करण्याचं काम केले आहे.

एवढंच नाही तर हा मुद्दा घेऊन विधान परिषदेत सुद्धा आठ आमदारांनी हा मुद्दा लावून धरला आहे.

त्याचबरोबर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून जे ग्रामसेवक हे मुख्यालयी राहत नसतील त्यांच्यावर म.जि.प.जिल्हा सेवा शिस्त व अपील नियम १९६४ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

तरीही तालुक्यातील एकही ग्रामसेवक हे मुख्यालयी राहत नसतानाही देखील शासनाची व सर्वसामान्य जनतेच्या पैशाच्या अपव्यय करण्याचे काम करत आहे. हाच मुद्दा घेऊन संभाजी ब्रिगेड मार्फत सर्व ग्रामसेवक यांना निवेदन देऊन ग्रामसभेच्या प्रोसिडिंग ची सत्य प्रत मिळावी या आशयाचे निवेदन देण्यात येत होते.

परंतु मागील अनेक दिवसांपासून या संघटनेचे अध्यक्ष असलेले नरेंद्र पवार यांना निवेदन देण्यासाठी त्यांच्या ग्रामपंचायत कार्यालयाला अनेक वेळा भेट देऊन

त्याच बरोबर अनेक वेळा भ्रमण ध्वनी द्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही हे आधिकारी कॉल घेत नसल्यामुळे आज धोंडी पिंपळगाव या गावी गेलो असता ग्रामसेवक आधिकारी नरेंद्र पवार हे मुख्यालयी राहत नाहीत हे दिसून आले.त्याचबरोबर गावातील अनेक लोकांशी चर्चा केली असता हे आधिकारी येथे राहत नसल्याचे कळाले.

त्यांना संपर्क साधल्या नंतर मी निवेदन स्वीकारण्यासाठी येत नाही. माझी जी काही तक्रार करायची असेल ती वरिष्ठाकडे करा.अश्या उद्धट भाषेचा वापर या आधिकऱ्यानी केला.




याचाच अर्थ ग्रामसभेचा ठराव देऊन मी याच गावी राहत असल्याचा खोटा ठराव सादर करून सर्व सामान्य जनतेची त्याच बरोबर शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी याच्यावर कारवाई व्हावी अशी मागणी संभाजी ब्रिगेड च्या वतीने करण्यात आली आहे. जो पर्यंत अश्या मग्रूर आधिकारी यांच्यावर कारवाई होत नाही. तो पर्यंत हा लढा चालू राहणार आहे असे संभाजी ब्रिगेड च्या वतीने सांगण्यात आले.

## जामा मस्जीद चौकातील साडेतीन वर्षापासून बंद पडलेला हायमक्स सुरु

साद बीन मुबारक यांच्या पुढाकार

**जालना । प्रतिनिधी -** शहरामध्ये महत्वाच्या अनेक ठिकाणी चौकामध्ये हायमक्स बसवण्यात आलेले आहे. काही दिवससानंतर बंद पडलेले हायमक्स नंतर वर्षानुवर्षे तसेच बंद पडून राहतात. त्या-त्या परिसरातील नागरीक हायमक्स तसेच पथदिवे चालू करण्यासंबधी प्रशासनाकडे हेलपाटे मारतात. परंतू कुंभकर्णी झोपेत असलेल्या संबंधित प्रशसानास जागे करण्यास सर्व सामान्य नागरीकांना दर वेळेस अपयश येते ही फार मोठी शोकांतीका आहे.

असेच जालना शहरातील माळीपुरा भागातील जामा मस्जिद चौकामध्ये साडेतीन वर्षांपूर्वी मोठा गाजावाजा करून हाय मॅक्स बसवण्यात आला होता सदरील ठिकाण हे अत्यंत महत्त्वाचे असल्याने त्या ठिकाणी मस्जीद आणि दर्गाह असून रहदारीच्या बाबतीत वर्दळीचा चौक असल्याने या ठिकाणी हायमक्स बसविण्यात आला होता. मात्र मागील साडेतीन वर्षापासून हा हायमॅक्स बंद पडलेला असून या चौकामध्ये अंधाराचे साम्राज्य पसरले होते. या साडेतीन वर्षांमध्ये परिसरातील अनेक नागरिकांनी अनेक वेळा नगर पालिका त्यानंतर महानगरपालिकेला हेलपाटे मारले, आपल्या भावना व्यक्त केल्या, समस्या सांगितल्या परंतु एकही अधिकाऱ्याने याकडे गांभीर्याने पाहिले नाही. शेवटी परिसरातील नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते साद बिन मुबारक यांना समस्या सांगितले असता मागील काही दिवसांपासून साद बिन मुबारक यांनी महानगरपालिकांच्या अधिकाऱ्यांसमोर वेळोवेळी ही समस्या मांडली आणि त्यांच्या पुढाकारातून काल दिनांक २६ बुधवार रोजी संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांनी हा हायमॅक्स दुरुस्त केला. साद बिन मुबारक यांच्या पुढाकाराला स्थानिक पत्रकार लोकाधिकार न्युज चे संपादक सय्यद अफसर यांनी साथ दिली आणि त्यांच्या मदतीने रात्री हायमॅक्स सुरू झाल्यामुळे परिसरातील नागरिकांनी या दोघांचा शाल आणि हार घालून सत्कार केला. यावेळी गुलाम महेबूब अब्दुल ख़लीक़ (मुतावल्ली जामा मस्जिद जालना) मोहम्मद मोहिब गुलाम महेबूब, शेख मुख्तार, सैय्यद शेकर, अरबाज खान, मालिक अहमद, शेख शोएब, मुसेब कुरैशी, शेख कलीम, शेख आरिफ, मुगिरा खान,फहीम बिल्डर, शेख रॉसेफ, जुनेद खान, शेख सादिक, शेख वसीम, सय्यद अजीम, शमसुद्दीन, शेख अरबाज, अनस कुरैशी, सय्यद मजीद, शेख जमील नाना, शेख अनीस, सय्यद सादिक, शाहरुख खान, सय्यद अजीम, सय्यद अबरार, शेख अल्फ़ाज़, शेख सरफ़ज़, सय्यद अनस, सय्यद अफसर सह आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## अलखैर फाऊंडेशनच्यावतीने गरजवंतांना शिरखुर्मा किटचे वाटप




**जालना । प्रतिनिधी -** सामाजिक कार्यात अग्रसेर असलेल्या अलखैर फाऊंडेशन च्या वतीने रमजान ईदच्या पार्श्वभुमीवर शहरातील गोर गरजवंत मुस्लिम कुंटुबियांच्या घरात सुध्दा ईद साजरी करता यावी म्हणुन आज दि.२७ गुरूवार रोजी दुपारी चार वा. पासून दोनशे पन्नास परिवारांना शिरखुर्मा साहीत्याचे किट वितरित करण्यात येत आहे.तर शंभर कुंटुबियांना रेशन किट वितरित करण्यात आले. अलखैर फाउंडेशनचला १वर्ष पुर्ण झाले असून फाऊंडेशन च्या वतीने आतापर्यंत अनेक सामाजिक काम केले असल्याची माहीती अलखैर फाउंडेशनचे अध्यक्ष वसिम खान यांनी दिली आहे. या वेळी अलखैर फौंडेशनचे अध्यक्ष वसीम खान ,उपाध्यक्ष आमेर शेख ,इमरान बादशा ,शेख मुक्रम, रेहान शेख, समीर खान , अनस शेख , आदिल शेख , समीर उल्ला, इलियास मुसा, मुजम्मिल शेख ,अशपाक सय्यद,वसीम शेख , अरबाज मनियार, साहिल खान ,खिजर शेख ,शहेबाज शेख, आदींची उपस्थिती होती.

# जिल्हाप्रमुख अंबेकरांच्या विनंतीनंतर शिवसैनिक म्हसलेकरांचे आंदोलन मागे!

**बदनापूर । प्रतिनिधी** - बदनापूर तालुक्यातील शिवसैनिक कारभारी म्हसलेकर यांनी शेतकर्यांची सटसकट कर्जमुक्ती करण्यात यावी. या प्रमुख मागणीसह शेतकर्यांच्या अनेक प्रश्नावर लक्ष वेधण्यासाठी अकोला निकळक येथे मागील दोन दिवसांपासून विहिरीत बाज सोडून त्यावर बसून उपोषण सुरू केले होते. आज शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी त्यांची आंदोलनस्थळी भेट घेऊन केलेल्या विनंतीनंतर लिंबू पाणी घेऊन आंदोलन मागे घेतले.

यावेळी त्यांच्या समवेत जिल्हा उपनिबंधक परमेश्वर वरखडे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा संघटक भानुदास घुगे, उपजिल्हाप्रमुख भगवानराव कदम, सरपंच महादू गीते, यांच्यासह आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, कारभारी म्हलेकर हे शेतकर्यांच्या प्रश्नावर सातत्याने लढत आहेत. आंदोलने करून त्यावर आवाज उठवत आहेत. त्यांचे हे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शेतकरी कर्जमुक्त झालाच पाहिजे. अशी सातत्याने भूमिका घेतली. काँग्रेस सरकार असताना बीड जिल्ह्यात त्यांनी देता की जाता असा नारा देऊन भव्य मोर्चा काढला होता. देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात त्यांनी अत्यंत अग्रही भूमिका घेऊन कर्जदार शेतकऱ्यांसाठी प्रत्येकी दीड लक्ष रुपयांची कर्जमाफी करून घेतली होती. तर उद्धवजी ठाकरे स्वतः मुख्यमंत्री झाल्यानंतर दोन लक्ष रुपयांचे कर्ज सरसकट माफ करून शेतकऱ्यांना दिलासा दिला होता. मात्र आता केंद्र सरकारने देशातील बड्या उद्योगपतींचे सुमारे दहा ते बारा लाख कोटींचे कर्ज माफ केले. पण कर्जाच्या ओझ्याखाली सातत्याने दबून गेलेल्या व आत्महत्या करणार्या शेतकर्यांना कर्जमुक्ती नाकारली.



जगाचा अन्नदाता, जगाचा पोशिंदा असे एकीकडे त्याला म्हणत असताना कोणताही लाभ मात्र त्याला मिळू द्यायचा नाही. अशी सरकारची भूमिका चुकीची असल्याचे अंबेकर म्हणाले. आगामी काळात पक्षाच्या धोरणाप्रमाणे शेतकर्यांच्या प्रश्नावर आवाज उठून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील. असेही यावेळी ते म्हणाले. यावेळी संजय जाधव, सरपंच महादू गीते, विलास सावंत, ऋषी थोरात,अंबादास गीते, शिवाजी मदन, अतुल मदन, केशव क्षीरसागर, कडूबा केकान, अण्णा तांबे, राजू थोरात, गणपत केकान, गणेश सांगळे, दत्ता तांबे, निवृत्ती गीते, इमरान शेख, समशेर पठाण यांच्यासह आदी ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# वाटूर येथे बसस्थानकाअभावी प्रवाशांचे हाल

**वाटूर । प्रतिनिधी** - जालना नांदेड महामार्गावरील महत्त्वाची बाजारपेठ असलेल्या परतूर तालुक्यातील वाटूर येथे बसस्थानक नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. बसस्थानक नसल्याने महामार्गाच्या कडेला उभे राहून नागरिकांना बसची वाट पाहावी लागते.

वाटूर हे गाव जालना- नांदेड महामार्गावरील बाजारपेठेचे गाव आहे. येथून नागपूर, मुंबई, नाशिक, पुणे व राजस्थान या लांब पल्लूयाच्या बस येथून जातात. त्यांचा वाटूर येथे शाळा कॉलेज आहे. त्यामुळे वाटूर चौकात नेहमी प्रवाशांची गर्दी असते. लांब पल्ल्याच्या गाड्यासह जिंतूर, परभणी, नांदेड, गंगाखेड, कंधार या मार्गावरील बसदेखील या ठिकाणी थांबतात. त्यामुळे प्रवाशांसाठी निवारा म्हणून या ठिकाणी बसथांबा उभारणे गरजेचे आहे. प्रवाशांकडून सातत्याने बसथांबा उभारण्याची मागणी होत आहे.

रोज ६ हजार जवळपास विद्यार्थ्यांचे अपडाउन परतूर व मंठा तालुक्यातील जवळपास ४० ते ५० गावातील मुलेमुली वाटूर येथे शिक्षणासाठी येतात. येथील इंग्लिश स्कूल, जिल्हा परिषद शाळा, महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेतात. मानव विकास मिशनच्या बसेसची सेवा या विद्यार्थ्यांना मिळते. मात्र शाळा सुटल्यावर वाटूर चौकात विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होते.

या चौकात नेहमी प्रवासी यांचे छोटे मोठे अपघात होतात. तसेच संध्या उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे महिला मुलांना थोरपुरुष महिलांना उन्हात उभा राहून घंटो बसची वाट पाहत उभे राहतात .. नेहमी प्रवाशाची गर्दी आहते पाकीट चोर मोबाईल चोर मंगळवारी बाजार दिवशी प्रवासी चे खिसे रिकामे करताहेत या मुळे बस्थांनक नसल्याने प्रवासी महिलांचे अतोनात हाल होतात.. तसेच संध्या शाळीचे पेपर असल्यामुळे भर दुपारी दोन वाजता पेपर सुटल्यानंतर विद्यार्थीनी विद्यार्थ्यांना बसची वाट पाहत वाटुर चौकात व मंठा परतुर जयपुर जालना रोड चोही बाजूने विद्यार्थी व प्रवासी जाण्याकरिता दुकानाच्या हॉटेल शेडचे सहारा घेत सावलीमध्ये उभे राहून गर्दी करताना दिसत आहे या मुळे महिलांना बालकांना मोठी कसरत करत प्रवास करताना दिसून येते आहे.








हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.